I O करिता

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S.(ठाणे):** संगमनेर शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0173 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**27/02/2026 02:44

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 26/02/2026

**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 26/02/2026

**Time From (वेळेपासून):** 12:14 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:29 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 27/02/2026 **Time (वेळ):** 02:28 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 005

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/02/2026 02:28 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसील कार्यालय संगमनेर ,संगमनेर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): राजु बबन आल्हाट

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1988

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पारापोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल,अहिल्यानगर ,संगमनेर शहर , अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल,अहिल्यानगर ,संगमनेर शहर , अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9420896263

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | कैलास विठ्ठल खाडे | | | 1. सिडफाम अकोले ,अकोले, संगमनेर शहर ,अहिल्यानगर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दि.27/02/2026

मी राजु बबन आल्हाट, वय 38 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर, मो.नं. 9420896263.
समक्ष संगमनेर षहर पोलीस स्टेषन,जि.अहिल्यानगर येथे हजर राहुन सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे पोलीस निरीक्षक या पदावर दिनांक 10/07/2023 पासुन कार्यरत आहे.
दि.25/02/2026 रोजी श्री.अजित त्रिपुटे,पोलीस उपअधीक्षक,ला.प्र.वि.अहिल्यानगर यांनी एका तक्रारदाराचा मोबाईल क्रमांक देवुन सदर मोबाईल क्रमांकावर संपर्क करून तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे पुढील कारवाई करणेबाबत आदेषित केलेले होते त्याप्रमाणे आम्ही तक्रारदार श्री. रोहिदास रंगनाथ काळे यांचेषी संपर्क करून त्यांचे तक्रारीबाबत माहिती घेतली असता त्यांनी तक्रारीचा आषय सांगुन लोकसेवक लाच मागणी करत असलेबाबत तक्रार सांगितली व ते सदर लोकसेवकास दि. 26/02/2026 रोजी तहसिल कार्यालय, संगमनेर, जि.अहिल्यानगर येथे भेटणार असलेबाबत सांगितले.तक्रारदार यांनी सांगितलेल्या तक्रारी नुसार लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हा होत असल्याने आम्ही गापेनिय कामकाजाकरीता जिल्हा विषेश लेखापरीक्षक, सहकारी संस्था,अहिल्यानगर यांचे कडुन उपलब्ध करून घेतलेले व कार्यालयामध्ये हजर असलेल्या पंचांना आमचे कक्षामध्ये बोलावुन त्यांना एका तक्रारदाराकडे लोकसेवक लाच मागणी करत असलेबाबत तक्रारीचा आषय सांगितला व सदर तक्रारदार हे लोकसेवकास दिनांक 26/02/2026 रोजी तहसिल कार्यालय,संगमनेर येथे भेटणार असल्याचे पंचांना सांगुन तक्रारदार यांनी सांगितल्याप्रमाणे पुढील कारवाई करणेबाबत सांगितले व नमुद दोन्ही पंच साक्षीदार यांना सदर कारवाईमध्ये आपण पंच म्हणुन काम करण्यास तयार आहात काय? याबाबत पंचांची संमती विचारली असता पंचांनी त्यास संमती दिली. तसेच आम्ही कार्यालयात हजर असलेले पोना काळे, पोका सुपेकर, पोका कुळधर, यांना आमचे कार्यालयीन कक्षात बोलवुन दोन्ही पंचांची सापळा पथकाषी ओळख करून दिली व नमुद पंच साक्षीदार तसेच सापळा पथकातील कर्मचा-यांना दिनांक 26/02/2026 रोजी सकाळी 07/45 वा.चे सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात हजर राहणेबाबत कळविले.
आम्ही दिलेल्या सुचनांप्रमाणे दि. 26/02/2026 रोजी अहिल्यानगर महानगरपालिका येथील दोन पंच साक्षीदार तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयातील कर्मचारी हे 07/45 वा.चे सुमारास कार्यालयात हजर झालेनंतर आम्ही सापळा पथकास सापळा कारवाईकामी आवष्यक असलेले सर्व साहित्य सोबत घेण्यारा सांगुन आम्ही, दोन्ही पंच, सापळा पथकातील कर्मचारी असे सर्व साहित्यानिषी षासकीय वाहन क्र. एमएच-16 डि.डब्ल्यु 7014 ने 08.15 वा. निघुन अहिल्यानगर-आळेफाटा-घारगाव मार्गे 10/45 वा. चे दरम्यान संगमनेर येथील सुरक्षित ठिकाणी पोहचलो. संगमनेर येथील सुरक्षित ठिकाणी पोहचत असताना तक्रारदार यांना फोनद्वारे सुरक्षित ठिकाणाबाबत माहिती दिली त्याप्रमाणे तक्रारदार हे त्यांचेकडील दुचाकी वाहनाने आम्ही थांबलो त्या ठिकाणी आले. आमचे सुचनेवरून दोन्ही पंचांनी तक्रारदार यांना त्यांचे नाव पत्ता व तक्रार विचारली असता तक्रारदार यांनी त्यांचे पुर्ण नाव श्री. रोहिदास रंगनाथ काळे,वय-34 वर्षे,व्यवसाय-षेती व मजुरी,रा.भोजदरी,ता.संगमनेर,जि.अहिल्यानगर,असे सांगुन त्यांची तक्रार सांगितली की, " मी वरील ठिकाणी माझे परिवारासह राहण्यास आहे.माझे वडील रंगनाथ काळे व चुलते हरिभाउ नाना काळे,चिमा नाना काळे व तान्हाजी नाना काळे यांचे नावावर मौजे भोजदरी,ता.संगमनेर येथील गट नं.11○6 मधील क्षेत्र 2 हे.76 आर ख.0.38आर असे जमीनीचे क्षेत्र असुन दिनांक 23/02/2012 रोजी सदर गट नं.116 मधील क्षेत्राचे माझे वडील रंगनाथ काळे व चुलते हरिभाउ काळे,चिमा काळे व तान्हाजी काळे यांचे नावे खातेवाटप करण्यात आले आहे व 7/12 उता-यावर स्वतंत्र पोट हिस्स्यांची नोंद लावण्यात आलेली आहे.

त्याचा फेरफार क्रमांक 406 असा आहे. परंतु 7/12 उता-याचे संगणकीकरण करताना गट नं.116 क्षेत्र 2 हे 76 आर ख. 0.38 आर या जमीनीला वडील रंगनाथ काळे,चुलते रहिभाउ काळे,चिमा काळे,तान्हाजी काळे व आत्या पार्वताबाई लक्ष्मण मधे,भिमाबाई लक्ष्मण दुधवडे यांची नावे लागलेली असुन पुन्हा एकत्र गट झाल्याचा दिसुन आला म्हणुन माझे चुलते श्री तान्हाजी काळे यांनी मा.तहसिलदार,संगमनेर यांचे कार्यालयात दिनांक 27/11/2024 रोजी मौजे भोजदरी येथील गट नं.116 मधील क्षेत्र 2 हे 76 आर खराबा 0.38 आर या जमीनीचे चैघा भावांची स्वंतत्र पोट हिस्स्या प्रमाणे 7/12 उता-यावर नोंद करणेबाबत विनंती अर्ज केला होता व सदर अर्जासोबत आवष्यक ती कागदपत्रे जोडलेली होती.त्यानंतर सदर अर्जाचे सुनावणीकामी हजर राहणेबाबतची तहसिलदार कार्यालय,संगमनेर येथील दिनांक 08/01/2026 रोजीची नोटिस आम्हाला दिनांक 24/01/2026 रोजी तलाठी कार्यालय,वनकुटे येथील तलाठी भाउसाहेबांच्या मार्फतीने प्राप्त झाली असता सदर नोटिसीमध्ये सुनावणीची दिनांक 22/01/2026 अषी नमुद करण्यात आलेली होती.सुनावणीची तारीख होवुन गेल्यानंतर आम्हाला सदरची नोटीस प्राप्त झाली होती. त्यामुळे मी सोबत चुलते तान्हाजी काळे असे तहसिल कार्यालय, संगमनेर येथील महसुल सहायक श्री.खाडे साहेब यांना भेटलो त्यावेळी त्यांनी मला दिनांक 05/02/2026 रोजी माझे वडील, चुलते व आत्या यांना सुनावणीकामी हजर राहण्याबाबत तोंडी सुचना दिल्या. त्याप्रमाणे दिनाक 05/02/2026 रोजी माझे वडील,तीन चुलते व तीन आत्या असे सुनावणीकामी तहसिलदार कार्यालय,संगमनेर येथे मा.तहसिलदार,संगमनेर यांचे समक्ष हजर राहिले.व आमचे लेखी म्हणणे सदर सुनावणीवेळी सादर केले सदर सुनावणीवेळी मी देखील हजर होतो.सुनावणी वेळी तहसिलदार साहेबांनी आमचे म्हणणे ऐकुन घेतले त्यावेळी महसुल सहायक खाडे साहेब हे देखील हजर होते व त्यांनी देखील 7/12 उतारे संगणीकृत करत असताना माझी आत्यांची नावे 7/12 उता-यावर लागली असल्याचे व एकत्र गट तयार झाल्याचे तहसिलदार साहेबांना सांगितले. त्यानंतर सुनावणी करीता हजर असलेले माझे वडील,चलुते व आत्या यांचे अंगठयांचे ठसे महसुल सहायक खाडे यं◌ानी सुनावणीच्या कागदपत्रांवर घेतले.त्यानंतर महसुल सहायक खाडे यांनी मला दिनांक 11/02/2026 रोजी ते 23/02/2026 रोजी पावेतो वेळोवेळी व्हटसअप अप कॉल केले व मला सांगितले कि,तहसिलदार साहेबांनी तुमच्या बाजुने निकाल दिला असुन फेरफार क्रमांक 406 प्रमाणे गट नं.116 मधील क्षेत्राच्या 7/12 उता-यामध्ये माझे वडील व चुलत्यांचा स्वंतत्र पोटहिस्स्याची नोंद करण्याचा व 7/12 उता-यामधुन माझ्या आत्याची नावे वगळण्याचा निकाल दिलेला आहे असे सांगुन माझे चुलतांच्या नावे दिलेल्या अर्जामधील सुनावणीमध्ये मदत केल्याचे मोबदल्यात व तहसिलदार साहेबांनी दिलेल्या निकालाच्या आदेषाची प्रत देण्याकरीता खाडे साहेबांनी माझे कडे 13,000/- रूपये लाचेची मागणी केली त्यावेळी माझे लक्षात आले कि,महसुल सहायक खाडे साहेब हे आम्ही तहसिल कार्यालय,संगमनेर येथे दिलेल्या अर्जाचे सुनावणी मध्ये मदत केल्याचे मोबदल्यात तसेच मा.तहसिलदार साहेबांनी दिलेल्या निकालाची प्रत देण्याकरीता 13,000/- रूपये लाचेची मागणी करत आहे मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही.'' अषी तक्रार सांगितली. आम्ही तक्रारदार यांची तक्रार त्यांचे स्वहस्ताक्षरात लिहुन घेतली. सदर तक्रारी वर तक्रारदार, आम्ही व दोन्ही पंचानी स्वाक्षरी केली.तक्रारी जबाब नोंदविल्यानंतर तक्रारदार श्री.काळे यांनी त्यांचे चुलते श्री.तान्हाजी काळे यांनी तहसिल कार्यालय,संगमनेर येथे दाखल केलेला अर्ज व त्यासोबतच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती तसेच तक्रारदार यांचे वडील,चुलते व आत्या यांना तहसिल कार्यालय,संगमनेर यांचेकडील सुनावणीबाबतच्या नोटीषीची छायांकित प्रत,मंडळ अधिकारी कार्यालय,घारगाव यांनी तहसिलदार,संगमनेर यांना गट नं.116 मधील क्षेत्रात कलम 155 अन्वये स्वतंत्र उतारा मिळणेबाबत दिलेल्या पत्राची छायांकित प्रत इत्यादी कागदपत्रे त्यांच्या स्वाक्षरीसह सादर केले असता सदर कागदपत्रांवर आम्ही व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी करून सदर कागदपत्रे ताब्यात घेतली.

त्यानंतर तक्रारदार श्री. रोहिदास काळे यांचे तक्रारीप्रमाणे लोकसेवक खाडे यांची लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले. आम्ही लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवुन त्याच्या वापराबाबत तक्रारदार श्री. रोहिदास काळे व दोन्ही पंचांना माहिती समजावुन सांगितली. त्यानंतर आम्ही व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डरमध्ये एक नविन मेमरीकार्ड घालुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याबाबत तक्रारदार श्री.रोहिदास काळे व दोन्ही पंचांची खात्री करून दिली. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये तक्रारदार श्री. रोहिदास काळे यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करणेकामी आम्ही, दोन्ही पंच व तक्रारदार श्री. रोहिदास काळे असे संगमनेर येथे सुरक्षित ठिकाणी उपस्थित असलेबाबत निवेदन ध्वनिमुद्रित केले. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.रोहिदास काळे यांना लोकसेवक खाडे कोठे भेटतील याबाबत विचारले असता त्यांनी लोकसेवक खाडे हे तहसिल कार्यालय,संगमनेर येथे भेटणार असल्याचे सांगितले. त्यानुसार आम्ही लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाईबाबत तक्रारदार व पंच नं. 1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार श्री.रोहिदास काळे यांच्या गळयात कोणासही दिसणार नाही अषा पध्दतीने अडकवुन आम्ही तक्रारदार व पंच नं.1 यांना तहसिल कार्यालय,संगमनेर येथे 12/14 वाजता तक्रारदार

यांचेकडील दुचाकी वाहनाने रवाना केले. त्यानंतर 12/53 वाजेच्या सुमारास तक्रारदार व पंच नं. 1 आम्ही थांबलो त्याठिकाणी परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार श्री.रोहिदास काळे यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. आम्ही पंच नं. 1 यांना लोकसेवक खाडे यांची भेट घेण्याकरीता रवाना केल्यापासुन परत येई पर्यत घडलेल्या घटने विशयी पंच नं. 2 यांचे समक्ष विचारले असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचेकडील मोटारसायकलने रवाना होवुन तहसिल कार्यालय,संगमनेर येथे गेलो. त्यावेळी तक्रारदार व सोबत मी असे तहसिल कार्यालयाचे पाहिल्या मजल्यावरील निवासी नायब तहसिलदार,महसुल नायब तहसिलदार असा बोर्ड असलेल्या कक्षामध्ये प्रवेष करून पार्टिषन करून बनवलेल्या लहान केबिनमध्ये गेलो तेथे एक इसम खुर्चीवर बसलेले होते व सदर इसमाचे बाजुचे भितीला अधिकार टेबल असे लिहिलेला बोर्ड होता. त्यावेळी तक्रारदार श्री.रोहिदास काळे यांनी तेथे बसलेल्या इसमास नमस्कार खाडे साहेब असे म्हणाले असता समोरील इसम तक्रारदार यांना काय रे,काय म्हणतो असे म्हणाले त्यावेळी माझे लक्षात आले कि,सदर इसम हे लोकसेवक खाडे आहे.त्यानंतर तक्रारदार श्री. रोहिदास काळे यंानी लोकसेवक खाडे यांना त्यांची आत्याची नावे 7/12 उता-यामधुन कमी करण्याबाबत चर्चा केली.त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक खाडे यांना तक्रारदार यांचे चुलत्यांनी दहा हजार रुपये जमा केल्याचे सांगितले व चुलते तेरा हजार रूपये जास्त आहे असे बोलत असल्याचे तक्रारदार यांनी लोकसेवक खाडे यांना सांगितले त्यावेळी लोकसेवक खाडे तक्रारदार यांना म्हणाले कि,तुमच्या दोघाचं करायच ना मग,तुझच करून देवु का मगं असे म्हणाले त्यानंतर लोकसेवक खाडे व तक्रारदार यांचेमध्ये फेरफारासंबंधी व चार जणांमध्ये झालेल्या वाटपासंबंधी चर्चा झाली,त्यानंतर तक्रारदार लोकसेवक खाडे यांना म्हणाले कि,तेरा हजारांमध्ये काहि कमी होईल का?त्यावर लोकसेवक खाडे तक्रारदार यांना म्हणाले कि,थांब दोन मिनिटं त्यानंतर लोकसेवक खाडे इतर लोकसोबत कामासंबंधी चर्चा करू लागले त्यानंतर लोकसेवक माझे संबंधी विचारु लागले असता तक्रारदार यानी लोकसेवक खाडे याना माझी ओळख चुलता असलेबाबत करून दिली व तांवे हाॅस्पीटलमध्ये उपचाराकरीता घेवुन आल्याचे सांगितले व त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक खाडे यंाना त्यांची आत्याची नावे कमी होतील ना असे विचारले असता लोकसेवक खाडे यांनी असे होणार आहे तसा आदेष केला असल्याचे सांगितले.त्यावेळी लोकसेवक खाडे तक्रारदार यांना म्हणाले कि,वरचे तिन कमी करून टाक जा, त्यावर तक्रारदार यांनी किती कमी करायचे सांगा असे लोकसेवक खाडे यांना विचारले असता लोकसेवक खाडे म्हणाले कि,वरचे तिन कमी करून टाकं तुला म्हंटलो ना आता,त्यावेळी तक्रारदार लोकसेवक खाडे यांना म्हणाले कि,वरचे तिन कमी करायचे का? त्यावर लोकसेवक खाडे म्हणाले हो,आधी दवाखान्यात जावुन ये,त्यावर तक्रारदार लोकसेवक खाडे यांना म्हणाले कि,दहा हजार रूपये आहेत थोडा टाईम लागेल त्यावेळी लोकसेवक खाडे म्हणाले कि,तु दवाखान्यात जा अगोदर मग ये माझेकडे,त्यानंतर पुन्हा लोकसेवक खाडे तक्रारदार यांना म्हणाले कि,तं वरचे कमी करून टाक तेवढे त्यावर तक्रारदार म्हणतात तीन हजार ना. त्यावर लोकसेवक खाडे हंा म्हणुन समती दिली,त्यानंतर तक्रारदार लोकसेवक खाडे यांना म्हणतात कि,दहा हजार आहेत त्यांचेकडे, फोन करून आणतो,आलो दिड दोन तासामध्ये त्यावर लोकसेवक खाडे तक्रारदार यांना हां असे म्हटल्यानंतर मी सोबत तक्रारदार असे सापळा पथक थांबलो त्या ठिकाणी परत आलो अषी हकिगत सांगितली.,त्यानंतर तक्रारदार यांना पंचासमक्ष हकिगत विचारली असता त्यांनी पंच नं.1 यांनी सांगितलेल्या हकिगती प्रमाणे हकिगत सांगितली.

तक्रारदार व पंच नं 01 यांनी सांगितलेल्या हकिकती वरून व रेकॉर्ड झालेल्या संभाशणा वरून लोकसेवक खाडे यांनी तक्रारदार श्री.रोहिदास काळे यांच्याकडे तक्रारदार यांचे चुलते श्री.तान्हाजी काळे यांनी तहसिल कार्यालय, संगमनेर येथे दिनांक 27/11/2024 रोजी मौंजे भोजदरी येथील गट नं.116 मधील क्षेत्र 2 हे 76 आर खराबा 0.38 आर या जमीनीचे चैघा भावांची स्वंतत्र पोट हिस्स्या प्रमाणे 7/12 उता-यावर नोंद करणेबाबत केलेल्या अर्जप्रकरणामधील सुनावणीमध्ये मदत केल्याचे मोबदल्यात व तहसिलदार,संगमनेर यांनी सदर अर्जप्रकरणामध्ये दिलेल्या निकालाच्या आदेषाची प्रत देण्याकरीता मागणी केलेल्या 13,000/- रूपये लाचेच्या रकमेमधुन 3000/- रूपये कमी करून तडजोडीअंती 10,000/- रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याची संमती दर्षवली असल्याचे निश्पन्न झाले.सदर कारवाईबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

त्यानंतर लोकसेवक खाडे यांचेविरोधात तहिसल कार्यालय,संगमनेर येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे ठरले त्याप्रमाणे आम्ही तक्रारदार यांना लाचेची रक्कम हजर करण्यास कळविले असता, त्यांनी त्यांचे वचतीतुन 10,000/- रक्कम त्यात 500 रुपये दराच्या 20 भारतीय चलनी नोटा हजर केल्या. सदर नोटांचे नंबर कोUया कागदावर लिहण्यात आले. तो कागद पंच न. 2 यांचे कडे देण्यात आला. आम्ही सदर सापळा कारवाईमध्ये अॅन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिवा यांचे गुणधर्माबाबत माहिती देवुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक पोका सुपेकर यांनी करुन दाखविले. तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटाना अॅन्थ्रासिन पावडर लावण्यात आली. आमचे सुचनेवरून सदर लाच रक्कम पोका सुपेकर यांनी तक्रारदार याचे षर्टचे समोरील डाव्या बाजुच्या खिषामध्ये ठेवुन दिली.त्यानंतर

आम्ही तक्रारदार, दोन्ही पंचाना व सापळा पथकास आवष्यक त्या सुचना दिल्या व तक्रारदार यांना कळविले की, त्यांनी तहसिल कार्यालय,संगमनेर येथे जावुन लोकसेवक खाडे यांची भेट घेवुन त्यांचसोबत कामा संदर्भाने तसेच तहसिलदार,संगमनेर यांनी दिलेल्या निकालाच्या आदेषाच्या प्रत बाबत चर्चा करावी तसेच लाच स्विकारले नंतरचा इषारा ठरवुन देण्यात आला. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमध्ये एक नविन मेमरीकार्ड घालुन ते व्हाईस रेकार्डर चालु करून तक्रारदार यांचे गळयात कोणास दिसणार नाही अषा पध्दतीने अडकविले तक्रारदार व पंच नं. 1 यांना लोकसेवक खाडे यांची भेट घेण्यासाठी तहसिल कार्यालय,संगमनेर येथे तक्रारदार यांच्या दुचाकी वाहनाने 14/47 वाजता रवाना केले. त्यांचे पाठोपाठ सापळा पथक तहसिल कार्यालय,संगमनेर येथे रवाना होवुन तहसिल कार्यालयाचे आजुबाजुस सापळा लावुन थांबलो. सापळा पथक आल्याची खात्री झाल्यानंतर तक्रारदार व पंच नं. 1 असे तहसिल कार्यालयाचे पहिल्या मजल्यावर गेले त्यांचे पाठोपाठ सापळा पथक तहसिल कार्यालयाचे पहिल्या मजल्यावर जावुन आजुबाजुस सापळा लावुन थांबलो.त्यावेळी तक्रारदार व पंच नं.1 असे निवासी नायब तहसिलदार, महसुल नायब तहसिलदार असा बोर्ड असलेल्या कक्षामध्ये जावुन पुन्हा बाहेर येवुन बाहेरील लोखंडाच्या थ्री सिटर बाकडयावर बसले. त्यानंतर बराच वेळा नंतर पुन्हा सदर कक्षामध्ये आतमध्ये जावुन आतमधील एका इसमा सोबत बोलत असल्याचे दिसुन आले व काहि वेळाने तक्रारदार,पंच नं.1 यांचेसोबत एक इसम कक्षामधुन बोलत बोलत बाहेर पडुन तहसिल कार्यालयाचे खाली येवुन तहसिल कार्यालयाचे दक्षिण बाजुस असलेल्या जय श्रीराम टि सेंटर येथे जावुन तक्रारदार त्यांचे सोबत आलेल्या इसमासोबत चर्चा करत होते व बाजुला पंच नं.1 त्यांची चर्चा ऐकत असताना सदर टि सेंटर जवळ तक्रारदार यांनी लाचेची रक्कम सदर इसमास दिली व सदर लाच रक्कम सदर इसमाने उजव्या हाताने स्विकारून टि सेंटर पासुन तक्रारदार यांचे सोबत सदर इसम व पंच नं.1 असे पुन्हा तहसिल कार्यालयाचे बाजुला जायले निघालेले असताना तक्रारदार यांनी लाच स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजित इषारा केला.ती वेळ 16/29 वा.ची होती त्यावेळी आमची व सापळा पथकाची लोकसेवक खाडे यांनी लाच स्विकारल्याची खात्री झाल्यानंतर आम्ही सदर ठिकाणी जावुन पच नं.1 यांना विचारणा केली असता त्यांनी सदर ठिकाणी हजर असलेल्या इसमाकडे बोट दाखवुन ते लोकसेवक खाडे असल्याचे सांगुन त्यांनी तक्रारदार श्री. काळे यांचेकडुन उजव्या हाताने 10,000/- रूपये लाच रक्कम स्विकारल्याचे सांगितले. त्यावेळी लोकसेवक खाडे यांना आम्ही ताब्यात घेतले व पंच नं.02 करवी लोकसेवक खाडे यांनी स्विकारलेली लाच रक्कम हस्तगत करून पंच नं.02 यांचेकडील कागदावर नमुद केलेल्या नोटांचे नंबराषी पडताळणी करून पंच नं.02 यांना लाच रक्कम ताब्यात ठेवणेबाबत सुचना दिल्या.तसेच लोकसेवक खाडे यांचे हातामध्ये डाव्या हातामध्ये मिळुन आलेले तक्रारदार श्री.काळे यांचे चुलते श्री.तान्हाजी काळे यांनी तहसिल कार्यालय,संगमनेर येथे दाखल केलेला मुळ अर्ज व त्यावर तहसिल कार्यालय,संगमनेर येथे झालेल्या सुनावणीची कागदपत्रे,तहसिलदार यांनी नोटिस अदा केल्याच्या तसेच निकालाच्या आदेषाची प्रती इत्यादी तक्रारदार श्री.काळे यांचे चुलत्यांनी दाखल केलेल्या अर्जाप्रकरणासंबंधी मुळ कागदपत्रे लोकसेवक खाडे यांचेकडे मिळुन आली.सदरची कागदपत्रे पंच नं. 2 यांनी आमचे सुचनेवरून ताब्यात घेतली. त्यावेळी आम्ही लोकसेवक खाडे यांना त्यांचे नाव,गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव कैलास विठ्ठल खाडे,वय- 33 वर्षे, पद- महसुल सहायक,तहसिल कार्यालय, संगमनेर ता.संगमनेर जि. अहिल्यानगर रा.सिडफाम,अकोले राजुर कडे जाणा-या रोडवर,ता.अकाले,जि.अहिल्यानगर असे सांगितले. त्यावेळी आम्ही तक्रारदार श्री.काळे यांना षासकिय वाहनाचे पाठीमागुन येण्यास सांगुन लोकसेवक खाडे यांना षासकिय वाहनामध्ये बसवुन सदर वाहनामध्ये काळया रंगाच्या कपडयाने आवष्यक तो अंधार करून लोकसेवक खाडे यांच्या हाताच्या व त्यांनी स्विकारलेल्या लाचरकमच्या नोटांच्या अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाषात आवष्यक त्या तपासण्या केल्या.त्यानंतर तक्रारदार श्री. खाडे यांना षासकिय विश्रामगृह,संगमनेर येथे येण्यास सांगुन आम्ही व सापळा पथक पुढील कामकाज करणेकामी लोकसेवक खाडे यांना घेवुन षासकिय विश्रामगृह येथे आलो व आम्ही दिलेल्या सुचनाप्रमाणे तक्रारदार श्री.काळे हे त्यांचेकडील दुचाकी वाहनाने षासकिय विश्रामगृह,संगमनेर येथे आले.त्यानंतर कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,संगमनेर यांना पत्र देवुन पंचनाम्याचे कामकाज करण्याकरीता विदयुत जोडणी असलेले दोन कक्ष उपलब्ध करून घेवुन त्याठिकाणी सापळा कारवाईचे पुढील कामकाज केले.

तरी दिनांक 26/02/2026 रोजी 12/14 ते 12/53 वाजेच्या दरम्यान तहसिल कार्यालय,संगमनेर येथे लाचमागणी पडताळणी वेळी यातील लोकसेवक कैलास विठ्ठल खाडे,वय- 33 वर्षे, पद- महसुल सहायक,तहसिल कार्यालय, संगमनेर ता.संगमनेर जि. अहिल्यानगर रा.सिडफाम,अकोले राजुर कडे जाणा-या रोडवर,ता.अकाले,जि. अहिल्यानगर यांनी तक्रारदार श्री. रोहिदास रंगनाथ काळे यांचेकडे तक्रारदार यांचे चुलते श्री.तान्हाजी काळे यांनी तहसिल कार्यालय,संगमनेर येथे दिनांक 27/11/2024 रोजी मौजे भोजदरी येथील गट नं.116 मधील क्षेत्र 2 हे 76 आर खरावा 0.38 आर या जमीनीचे चैधा भावांची स्वतंत्र पोट हिस्स्या प्रमाणे 7/12 उता-यावर नोंद करणेबाबत केलेल्या अर्जप्रकरणामधील सुनावणीमध्ये मदत केल्याचे मोबदल्यात व तहसिलदार,संगमनेर यांनी सदर

अर्जप्रकरणामध्ये दिलेल्या निकालाच्या आदेषाची प्रत देण्याकरीता मागणी केलेल्या 13,000/- रूपये लाचेच्या रकमेमधुन 3000/- रूपये कमी करून तडजोडीअंती 10,000/- रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याची संमती दर्षवली आहे व दिनांक 26/02/2026 रोजी 16/29 वाजेच्या दरम्यान लाचेच्या सापळा कारवाई वेळी लोकसेवक कैलास विठ्ठल खाडे,वय- 33 वर्षे, पद- महसुल सहायक,तहसिल कार्यालय, संगमनेर ता.संगमनेर जि. अहिल्यानगर रा.सिडफाम,अकोले राजुर कडे जाणा-या रोडवर,ता.अकोले,जि.अहिल्यानगर यांनी तक्रारदार श्री. रोहिदास रंगनाथ काळे यांचेकडुन लाचेची रक्कम 10,000/- रुपये स्विकारलेली आहे. लोकसेवक कैलास विठ्ठल खाडे यांनी आपल्या वैयक्तिक प्रभावाचा वापर करुन स्वतःचा सांपत्तीक फायदा करून घेण्याचे हेतुने, कायदेषीर परिश्रमीका खेरीज अन्य पारितोषण म्हणुन बेकायदेषीर मार्गाने बक्षीस स्विकारून,भ्रश्ट व बेकायदेषीर मार्गाने स्वतःचा आथिक लाभ करुन घेतला म्हणुन लोकसेवक कैलास विठ्ठल खाडे यांचे विरुध्द माझी भ्रश्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेषीर फिर्याद आहे.

समक्ष हि फिर्याद दिली.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

sameer navnath baravkar(I (Inspector)) / or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge,
Police S[illegible] पोलीस ठाणे अमलदार
(ठाणे प्रभा[illegible] संगमनेर शहर पोलीस स्टेशन
Name (नाव): जि. अहमदनगर Sa[illegible]avnath bar
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.):